जा.क्र. मरापप/डी.एड./प्रशा./०८
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे-१
दिनांक : २८।०५।२००८

प्रति,

प्राचार्य,

महाराष्ट्र शिक्षण मंडळाचे
संगमेश्वर अध्यापक विद्यालय, लातूर
ता. लातूर जि. लातूर.

विषय : सन २००७ -०८ या वर्षाकरिता नवीन अध्यापक विद्यालयास संकेतांक देणेबाबत.

संदर्भ : १) एन.सी.टी.ई. भोपाळ यांचे पत्र क्र. C-18977 दि. ६-७-२००७

२) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग यांचे प्रवेश परवानगीचे आदेश दि. ८।१०।२००७ क्र.टी.सी.एम.२००७/(३७०/०७) माशि-४ दि. ८।१०।२००७

३) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३० यांचे पत्र क्र. ४५३२ दि. २५।१०।२००७

४) शिक्षण निरिक्षक मुंबई (प.)/प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, मुरुड ता.जि.लातूर यांचा दि.------------- चा तपासणी /पडताळणी अहवाल.

एन.सी.टी.ई. भोपाळ यांनी उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये आपल्या संस्थेस नवीन अध्यापक विद्यालय सुरु करण्यासाठी काही अटी आणि शर्तीच्या अधिन राहून सन २००७-०८ पासून नवीन अध्यापक विद्यालयास मान्यता दिली आहे.

वरील अनुषंगाने आपल्या अध्यापक विद्यालयास "अध्यापक विद्यालय संकेतांक" ८९३० हा देण्यात आला आहे हा क्रमांक "तात्पुरता एक वर्षासाठीच" (२००७ – २००८) खालील अटींच्या अधिन राहून देण्यात आला आहे याची नोंद घेण्यात यावी.

| अ.क्र. | अध्या.विद्या. संकेतांक | अध्यापक विद्यालयाचे नाव | केंद्र क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | ८९३० | महाराष्ट्र शिक्षण मंडळाचे संगमेश्वर अध्यापक विद्यालय लातूर ता. लातूर, जि.लातूर. | ८१६२ -राजस्थान, लातूर. |

अटी व शर्ती :-

१. विषयनिहाय पुरेशा शिक्षकाअभावी अध्यापक विद्यालयामध्ये अध्यापन कार्य, सराव पाठ इत्यादी होणार नाहीत. त्यामुळे शैक्षणिक दर्जा राखण्यासाठी मा.संचालक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक

28.3.08

Sangmeshwar D.Ed. College
Latur

Principal
Sangmeshwar D.Ed. College
Latur

Principal
Sangmeshwar D.Ed. College
Latur

Principal
Sangmeshwar Adhyapak
Vidyalaya, Latur

संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या सन २००७ - २००८ च्या स्टाफ प्रोफाईलमध्ये अ.क्र. ......NIL......, ..........., पदे अमान्य केली आहेत. ती या शैक्षणिक वर्षाखेर NCTE च्या निकषानुसार भरुन त्रुटी पूर्तता अहवाल ३० सप्टेंबर २००८... पूर्वी सादर करावा लागेल. ३० सप्टें.२००८.... पूर्वी पूर्तता अहवाल सादर न केल्यास आपल्या अध्यापक विद्यालयास दिलेली संलग्नता दुसऱ्या दिवसापासून आपोआप रद्द होईल.

२. एन.सी.टी.ई. दिल्ली यांनी विहित केलेल्या निकषांचे (Norms and Standard) तंतोतंत पालन करणे बंधनकारक आहे.

३. प्रचलित शासन निर्णयानुसार व महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या मार्गदर्शक सूचनानुसार प्रवेश द्यावे लागतील.

४. व्यवस्थापन कोट्यातील प्रवेशास अस्तित्वात असलेल्या निकषानुसार सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता घ्यावी लागेल.

५. महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांनी ठरवून दिलेला अभ्यासक्रम, मूल्यमापन पध्दती, प्रात्यक्षिक कार्य आंतरवासिता इ. बाबीची काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.

६. लेखी परीक्षा, प्रात्यक्षिक परीक्षा, आंतरवासिता व मूल्यमापनासंदर्भात परीक्षा परिषदेने तसेच परिषदेच्यावतीने प्राचार्य DIET यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करावे लागेल.

७. संस्थेच्या / अध्यापक विद्यालयाच्या चुकीमुळे प्रवेशाबाबत न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास त्यांचा संपूर्ण खर्च अध्यापक विद्यालयाने परीक्षा परिषदेस एक रकमी भरावा लागेल.

८. परीक्षा परिषदेच्या परीक्षेच्या अधिसूचना आणि शासन निर्णयात अंतर्भूतपेक्षा जादा "परीक्षा फी" किंवा इतर कोणतीही फी घेता येणार नाही.

९. चालू शैक्षणिक वर्षाचे आपल्या अध्यापक विद्यालयाचे कामकाज, वार्षिक तपासणी, लेखा परीक्षण अहवाल, गतवर्षीचा मान्य स्टाफ प्रोफाईल व प्रत्यक्ष कार्यरत अध्यापक याची पडताळणी करुनच पुढील वर्षी संलग्नता चालू ठेवणे / रद्द करणे / नुतनीकरण करणेबाबत निर्णय घेतला जाईल.

१०. महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेल्या डी.एड्. अभ्यासक्रमातील सर्व तरतूदी तसेच राज्य डी.एड्. प्रवेश निवड समिती व मा.संचालक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या डी.एड्. प्रवेशसंदर्भातील सर्व नियम व मार्गदर्शक सूचनांचे पालन संस्थेस व अध्यापक विद्यालयास करणे बंधनकारक राहील.

११. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने डी.एड्. परीक्षा संचालनासंदर्भात दिलेल्या सर्व सूचना व नियमांचे / कार्यपध्दतीचे विहित वेळापत्रक पाळणे बंधनकारक राहील.

१२. महाराष्ट्र शासन, मा.संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे, आयुक्त महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे, प्राचार्य, डायट (संबंधित जिल्हा) / शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई यांनी शासन निर्णयाप्रमाणे दिलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन झाल्यास किंवा प्रतिज्ञापत्रावर

28.3.08

PRINCIPAL
Sangmeshwar D.Ed.College
Latur.

Principal
Sangmeshwar D.Ed. College
Latur

Principal
Sangmeshwar D.Ed. Col
Latur

Principal
Sangmeshwar Adhyapak
Vidyalaya, Latur

दिलेल्या हमीपत्रातील अटींचा व शर्तींचा भंग केल्याचे दिसून आल्यास परीक्षा परिषदेने दिलेली अध्यापक विद्यालयाची संलग्नता रद्द करण्यात येईल.

१३. अध्यापक विद्यालयास महाराष्ट्र खाजगी शाळा सेवाशर्ती नियम १९८१ व एन.सी.टी.ई. दिल्ली यांचे Norms and Standard चे पूर्णत: पालन करणें बंधनकारक आहे.

१४. अध्यापक विद्यालयाने प्राचार्यांची नेमणूक NCTE च्या नियमानुसार करुन त्यास विभागीय शिक्षण उपसंचालक यांची मान्यता घेणे आवश्यक आहे. विशेष परिस्थितीत प्रभारी प्राचार्यांची तात्पुरती मान्यता शिक्षण उपसंचालक यांची असल्यासच परीक्षेची आवेदनपत्रे स्विकारण्यात येतील.

१५. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत आयोजित केल्या जाणाऱ्या कोणत्याही परीक्षेसाठी अध्यापक विद्यालयाची इमारत व त्यातील फर्निचरसह परीक्षा परिषदेला उपलब्ध करुन द्यावी लागेल. तसेच अध्यापक विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी हे परीक्षा परिषदेमार्फत आयोजित केल्या जाणाऱ्या परीक्षांच्या कोणत्याही कामासाठी परीक्षा परिषदेस तात्काळ उपलब्ध करुन देणे अध्यापक विद्यालयास / संस्थेस / प्राचार्यास बंधनकारक राहील.

उपरोक्त अटीचे / शर्तीचे उल्लंघन केल्यास परीक्षा परिषदेने दिलेली संलग्नता रद्द करण्यात येईल. तसेच आपल्या अध्यापक विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा परिषदेमार्फत घेतल्या जाणार नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस संबंधित अध्यापक विद्यालय व संस्था जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

**अध्यापक विद्यालय संकेतांक या कार्यालयास परीक्षेंची आवेदनपत्रे सादर करताना न चूकता तसेच कार्यालयाशी पत्रव्यवहार करताना पत्रावर स्पष्ट दिसेल अशा मोठ्या अक्षरात छापून घ्यावा.**

स्थळ प्रतीवर मा.आयुक्त यांची स्वाक्षरी असे.

आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-१ करिता

प्रत माहितीस्तव :

३) सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
४) मा.संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे

प्रत कार्यवाहीस्तव :

४) विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर
५) प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, मुरुड ता.जि. लातूर
६) ~~शिक्षण निरिक्षक (पश्चिम), बृहन्मुंबई, मुंबई~~ / शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प.-लातूर

Principal
Sangmeshwar D.Ed. College,
Latur

PRINCIPAL
Sangmeshwar D.Ed.College
Latur.

Principal
Sangmeshwar D.Ed. College
Latur

Principal
Sangmeshwar Adhyapak
Vidyalaya, Latur